# भ्रमिष्ट सुंदरी

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B246

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**भ्रमिष्ट सुंदरी : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २३०/-

## अनुक्रमणिका

भ्रमिष्ट सुंदरी / ५
सुडाने पेटलेला आत्मा / ७७
शहाणा वेडा / १०३
हवाई युद्ध / १२३
धुरंधराची धमाल / १४३

# भ्रमिष्ट सुंदरी

मळवलीच्या डोंगरावर असलेले एक छोटेसे घर. दुरून ते छोटे दिसत असले, तरी बरेच मोठे होते. अकरा खोल्यांचा तो एक बंगला होता. इंग्रजांच्या कारकिर्दीत कधी तरी बांधण्यात आला होता.

एकांतात असलेला तो बंगला आता कोणाच्या मालकीचा आहे हे मळवली गावात कोणालाच माहीत नव्हते. अधूनमधून दोन-तीन गाड्यांचा ताफा यायचा, चारसहा  दिवस तो बंगला गजबजल्यासारखा वाटायचा आणि पाहता पाहता मंडळी जशी आली तशी निघून जायची. गावाला फक्त इतकेच माहीत होते.

त्या बंगल्यात कोण येते आणि कोण जाते हे पाहण्याची गरज गावाला मुळीच नव्हती. त्या बंगल्याची राखण करण्यासाठी जी दोन माणसे ठेवण्यात आली होती तीसुद्धा मळवली गावाला माहीत नव्हती. त्या दोघांच्या दिमतीसाठी एक जुनाट अशी कार होती. दोन-तीन दिवसातून एकदा ती कार गावांतून जाताना येताना दिसायची तेवढीच.

ती दोन माणसे गावात कधी मिसळलेली कोणालाच माहीत नव्हती. गावात त्यांनी कोणाशीही दोस्ती केली नव्हती; किंवा गावातील दुकानातून एखादी वस्तूदेखील त्यांनी खरेदी केलेली नव्हती.

एकाएकी संध्याकाळी सहा वाजता भरवेगात दोन गाड्या मळवली गावात शिरल्या पण गावाला मुळीच आश्चर्य वाटले नाही. त्यातील एक गाडी काचबंद होती. आत कोण बसले आहे ते बाहेरून पाहता येत नव्हते. गावातून गाडी जात असताना आत कोणी तरी जोरात ओरडले त्याचीदेखील

दखल ते गाव घेऊ शकले नाही. केवळ एकदोघातील कोणी तरी ओरडणे ऐकले होते. थोड्याच वेळात ते विसरून गेलेत.

दोन्ही गाड्या झाडाझुडपाने वेढलेल्या बंगल्याच्या फाटकाजवळ थांबल्या. बंगल्याचे ते फाटक जवळजवळ सहा फूट उंचीचे होते. टोकदार असे चौफेर खिळे असल्यामुळे त्या फाटकावरून चढून जाणे कोणालाही शक्य नव्हते. बंगल्याभोवतीचे कुंपण साडेसात फूट उंचीचे होते.... काटेरी तारांनी भरलेले. गाड्या उभ्या राहिल्या आणि तब्बल पाचसहा मिनिटांनी बंगल्यातून कुणी तरी धावत फाटकाजवळ आले. पुढच्या कारमध्ये बसलेल्या तरुणीबरोबर ती व्यक्ती चारपाच वाक्ये बोलली. खिशांतून चावी काढून आतल्या बाजूला लावलेले भलेमोठे कुलूप काढण्यात आले. फाटक उघडले गेले.

दोन्ही गाड्या फाटकापासून दोन फर्लांगावर असलेल्या बंगल्याच्या दारात उभ्या राहिल्या. फाटकाला कुलूप लावून त्या बंगल्याचा पहारेकरी धावत धावत गाड्यांजवळ आला.

त्या गाड्यांतून एकूण सहा माणसे खाली उतरली. त्या सहा जणात एक होती स्त्री. बंगल्याचे दोन्ही पाहरेकरी वेड्यासारखे त्या तरुणीकडे पाहात राहिले. इतकी सुंदर तरुणी त्यांनी जन्मात कधी पाहिली नव्हती. तिच्या अंगावरची साडी फाटलेली होती. तिचा स्लीवलेस ब्लाऊजदेखील डाव्या बाजूला फाडण्यात आलेला होता. तिला भरपूर मारपीट करण्यात आलेली आहे हे स्पष्ट दिसत होते.

तिला बंगल्याच्या दिवाणखान्यात नेण्यात आले. त्या दिवाणखान्यात भले मोठे दोन कंदील अडकण्यात आले होते. गावात वीज होती; पण त्या बंगल्यात वीज घेण्यात आली.

मंद उजेडात ती तरुणी जागच्या जागी खिळल्यासारखी उभी होती. एकाच जागी तिची नजर स्थिर झालेली होती त्या नजरेत कोणतेही भाव दिसत नव्हते. तिच्या चेहऱ्यावर कोणत्याही भावना नव्हत्या; पण अधूनमधून तिच्या चेहऱ्यावर भीतीच्या छटा उमटत होत्या आणि त्याचबरोबर नजरेतदेखील भीती जाणवत होती. तिच्या मनावर जबरदस्त भीतीचे दडपण असावे हे स्पष्ट दिसत होते. पण ज्या माणसांनी तिला बंगल्यात आणले होते त्यांना त्या



तरुणीबद्दल किंचितही दयामाया नव्हती. एक तरुण क्रूर नजरेने अधूनमधून तिच्याकडे पाहात होता...

त्याच तरुणाने या भ्रमिष्ट अवस्थेत दिसणाऱ्या तरुणीला बेदम चोप दिला होता. तिची इतकी वाईट अवस्था करण्यात आलेली होती की धड उभे राहण्याचीदेखील ताकद तिच्यात उरलेली नव्हती.

'बाजा, आता हिला प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. हिला सुरक्षित अशा खोलीत कोंडून ठेव. उद्या सकाळी मी तिला ठिकाणावर आणीन.' रुबाबदार कपडे केलेला तो तरुण कणखर आवाजात बोलला; आणि दाराजवळ असलेला तरुण तिच्या रोखाने पावले टाकू लागला.

तिच्या भावनाहीन चेहऱ्यावर एकाएकी भीतीची छाया पसरली. नकळत तिचे शरीर थरथरल्यासारखे झाले. भावनाहीन डोळ्यांत मूर्तिमंत भीती दिसू लागली. त्या तरुणाकडे पाहून ती जोरात ओरडली. आपण एखाद्या पिशाच्चाकडे पाहावे असेच तिला वाटले असावे.

'मला सोडा... मला ठार करू नका.' ती जोरात ओरडली. जेव्हा त्या तरुणाने तिला पकडले तेव्हा तिने जोराजोरात ओरडून स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या तरुणाच्या ताकदीपुढे क्षीण बनलेल्या त्या तरुणीला स्वतःचा बचाव करता आला नाही.

ओढतच तिला दिवाणखान्यातून नेण्यात आले तेव्हा तिने ती धडपड केली ती मात्र एकट्या तरुणाला आवरता आली नाही. त्याने आपल्याच जोडीदाराला हाक मारली. तिला दोघांनी वर उचलले आणि ती तरुणी हातपाय झाडीत असतानाच तिला एका छोट्या खोलीत नेले. त्या खोलीला खिडकी होती; पण त्या खिडकीला गज नव्हते. इंग्रजांच्या कारकिर्दीत बांधलेल्या त्या बंगल्याच्या खिडक्यांना, एकाही खिडकीला गज ठेवलेला नव्हते. गजाच्या खिडक्या तयार करण्याची गरज कदाचित त्या काळात कोणालाही भासली नसावी. कदाचित ती खिडकीतून पळून जाईल ही भीती दोघांच्याही मनात निर्माण झाली. दोघेही आपापसात कुजबुजले. त्यांनी तिचे हातपाय बांधण्याचा निर्णय घेतला. एकजण घाईघाईत दिवाणखान्यात आला त्याने आपल्या बॉसला आपल्याला धोका कोणता वाटतोय याची जाणीव दिली.

अर्ध्या तासात व्हिस्कीच्या बाटल्या फुटल्या. बंगल्याच्या किचनरूममध्ये बॉसला खूश करण्यासाठी कोणते पदार्थ बनवाने याची चर्चा करीत धावपळीला सुरुवात झाली.

त्याचवेळी मळवलीत घुसणाऱ्या हायवेवर एक कार संथपणे येऊन थांबलेली होती. ती कार मळवलीच्या गावात न शिरता तशीच अर्धा मैल पुढे गेली आणि डाव्या बाजूच्या झुडुपात शिरली.

कार ज्या ठिकाणी उभी राहिली होती ते ठिकाण सहजासहजी कोणाच्या लक्षात येण्यासारखे नव्हते. झुडुपात असलेली कार सहजासहजी कोणालाही दिसण्यासारखी नव्हती.

कारमधून उतरणारी व्यक्ती होती एक स्त्री. तिने कारच्या दाराला लॉक केले. दोनतीन मिनिटे कानोसा घेत आजूबाजूला नजर फिरवून तिने आपला पाठलाग झालेला नाही याची खात्री करून घेतली.

आणि झपाझप पावले टाकीत तिने चालायला सुरवात केली.

त्यावेळी सर्वत्र भयाण अंधार पसरलेला होता. दूरवर दिसणाऱ्या दिव्यांचा उजेड तिथपर्यंत मुळीच पोचू शकत नव्हता. आजूबाजूला कोणीही दडून राहिले असले तर ते कळण्याची मुळीच शक्यता नव्हती. कोणत्याही बाजूकडून हल्ला होण्याची शक्यता ती नाकारू शकत नव्हती.

मुंबईपासून आपला पाठलाग कदाचित झाला असेल या भीतीने तिला घेरलेले होते आणि हे पटल्यामुळेच तर तिच्या मनाची चलबिचल झालेली होती.

तिने मनातील सारे विचार झटकून टाकले. मान वर करून तिने डोंगराच्या माथ्यावर पाहिले; पण त्या भयाण अंधारात डोंगराच्या आकृतीशिवाय तिच्या नजरेला काहीही येऊ शकले नाही.

त्याच समोरच्या डोंगरावर तिला जायचे होते. यापूर्वी एकदाच ती या डोंगरावर आली होती, पण तिने हेतुपुरस्सर काहीही हालचाल केलेली नव्हती. आपल्याला जे हवे ते या बंगल्यात आणलेले नाही याची खात्री पटल्यामुळेच तिने पूर्वी हा निर्णय घेतलेला होता.

पण आता आपल्याला हवे ते या बंगल्यात सापडणार आहे... आज संध्याकाळी आपल्याला हवी ती तरुणी या ठिकाणी आणण्यात आलेली आहे याची खात्री तिला पटलेली होती. बदमाष कितीही मोठ्या संख्येने असले तरी



आज रात्री आपण त्या तरुणीची सुटका करायलाच हवी याच एका विचाराने तिला पूर्णपणे पछाडून सोडलेले होते.

अस्पष्टसा उजेड तिला दिसला तेव्हा डोंगराचा अर्धा चढ तिने पार केलेला होता. दिव्यांचा उजेड दिसताच ती खूष झाली. बंगल्यात कोणी तरी आहे याची खात्री तिला पटली. चढ चढून आलेला थकवा तिला त्यावेळी मात्र जाणवला नाही. नकळत तिने तुमानीच्या खिशात ठेवलेले रिव्हॉल्वर चाचपले. दुसरे सायलेन्सर लावलेले रिव्हॉल्वर तिने पाकिटाच्या खिशात ठेवले होते. कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवूनच ती आलेली होती. त्यामुळे मनात भीतीच्या शंका उभ्या करायला मुळीच सवड नव्हती. निदान अशावेळी तरी तिच्या मनाला भीतीचा लवलेश होणे शक्य नव्हते.

ती होती रातराणी. मुंबईच्या पोलीस खात्याला जसे तिने सळो की पळो करून सोडलेले होते; तसेच मुंबईच्या बदमाषांनीदेखील तिचा पूर्णपणे धसका घेतलेला होता. ती बंगल्याच्या उजव्या बाजूला आली. तिने बारकाईने बंगल्याकडे रोखून पाहिले. बंगल्याच्या आवारात कुत्रे नाही याची पुरेपूर कल्पना तिला यापूर्वी आलेली होती. फक्त प्रश्न होता तो कुंपण ओलांडून जाण्याचा. फाटक चढून जाणेदेखील धोक्याचे आहे हे तिने यापूर्वीच पाहिलेले होते. पण आत कसे शिरावे याचा विचार करूनच ती आलेली होती.

तिने कमरेच्या पट्ट्याला मागच्या बाजूला अडकवलेली एक आठ इंच लांबीची कात्री काढली. त्या कात्रीने कितीही जाडीची तार कापली जाण्यासारखी होती. त्यावेळी दीड- दोन फर्लांगावर असलेल्या बंगल्यातून जोरजोराने वाजविण्यात येणारी रेकॉर्ड ऐकू येत होती. आपण तार कापायला सुरुवात केली तर होणारा आवाज बंगल्यापर्यंत ऐकू येणार नाही याची खात्री तिला झालेली होती.

शांतपणे तिने काटे असलेली एकेक तार कापायला सुरुवात केली. जवळ जवळ अर्धा तास एकाग्रतेने आणि शांतपणाने तिचे काम चाललेले होते. एका क्षणाचाही खंड त्या कामात पडलेला नव्हता किंवा कसलाच अडथळा तिला आलेला नव्हता. अडथळा येण्याची शक्यता तिला वाटत नव्हती किंवा वाटलेली नव्हती.

चार फूट उंच आणि तीन फूट रुंद असा चौकोनी दरवाजा तिने पाऊण तासात तयार केला. खूष होऊन ती बंगल्याच्या आवारात शिरली. कात्री तिने जागच्या जागी अडकवली, जेव्हा ती बंगल्याच्या अगदी जवळ आली तेव्हा बंगल्यात आलेली माणसे तिला पूर्णपणे बेसावध असल्याचे जाणवले. बंगल्याबाहेर त्यावेळी कोणीही नव्हते. तिने बंगल्याच्या सभोवताली दोन चकरा मारल्या त्यावेळी साडेअकरा वाजलेले होते. आणखी दीड तास तरी थांबण्याचा  निर्णय तिने घेतला. शांतपणे ती एका फुलांच्या ताटव्याजवळ गवतात पडून राहिली.

त्यावेळी ती विचार करीत होती ती त्या बंगल्यात आणण्यात आलेल्या तरुणीचा.... तिच्यादृष्टीने ती तरुणी महत्त्वाची होती. ती सापडली, बोलली तर त्या बदमाषांचा अत्यंत काळा इतिहास आपल्याला समजेल याची तिला खात्री होती.

साडेबारा वाजले आणि संपूर्ण बंगल्यात शांतता पसरली.

दीड वाजला आणि गवतावर बसलेल्या रातराणीने आपल्या हालचालींना सुरवात केली. त्या बंगल्यात शिरणे तिला भाग होते, पण त्यासाठी तिने कोणतीही पूर्वतयारी केलेली नव्हती. त्या बंगल्यात तिने यापूर्वी कधीही प्रवेश केलेला नव्हता, पण आता जोपर्यंत आपण बंगल्यात जात नाही तोपर्यंत आपण कैदेत असलेल्या तरुणीची सुटका करू शकत नाही याची तिला जाणीव होती.

ती बंगल्याच्या उजव्या बाजूला आली. एका खिडकीच्या वरचे झडप उघडे असलेले तिने पाहिले. आत कुणी तरी झोपलेले असावे आणि उकाडा होत असल्यामुळे ते झडप उघडे ठेवण्यात आलेले असावे असा विचार तिने केला. त्याचवेळी पलीकडची एक खिडकी सताड उघडी असलेली तिला पाहायला मिळाली. कुणाचातरी घोरण्याचा आवाज तिने ऐकला.

कानोसा घेत रातराणी त्या खिडकीजवळ आली. आत झोपलेली दोन माणसे तिच्या सरावलेल्या नजरने  पाहिली; पण तिच्या मनाची किंचितही चलबिचल झाली नाही. त्यावेळी भीतीचा लवलेशही तिच्या मनाला शिवलेला नव्हता. तसे पाहिले तर रातराणीच्या दृष्टीने ही कामगिरी तशी फारशी धोक्याची नव्हती. याहून कितीतरी धोक्याची कामे तिने पार पाडलेली होती.



खिडकीतून ती अलगद आत उतरली. घोरणाऱ्याच्या सुरात तिच्या हालचालींमुळे कोणताही फरक पडलेला दिसून आला नाही. हलकेच ती उघड्या दारातून बंगल्याच्या अंतर्भागात शिरली.

तिच्या हालचालीत आता कमालीची सावधानता आलेली होती. तिच्या हालचालीचा किंचितही आवाज होत नव्हता. बारकाईने ती बाहेरून बंद असलेले दार दिसते का याची पाहणी करीत होती. सहज केवळ कुतुहलाने तिने एका उघड्या दारातून आत डोकावले आणि कुणीतरी मुडकुळे करून पडलेले आहे हे तिला दिसून आले. ती स्त्री असावी याची जाणीव तिला झाली.

रातराणी हळूच कॉटजवळ आली. ती स्त्री झोपलेली नाही याचा अंदाज तिने घेतला. बाजूची खिडकी सताड उघडली. खिडकीच्या आवाजाने कॉटवर हातपाय बांधलेल्या अवस्थेत असलेली स्त्री चाळवल्यासारखी झाली आणि रातराणीने त्याचवेळी घाईघाईत तिच्या तोंडावर हात दाबला आणि आपण योग्यवेळी हालचाल केली हे तिच्या लक्षात आले.

रातराणीने त्या तरुणीच्या तोंडावर हात ठेवला नसता तर ती निश्चित ओरडली असती आणि बंगल्यात झोपलेले बदमाश जागे झाले असते. हा विचार तिच्या मनात आला. तिने तोंड दाबूनच दुसऱ्या हाताचा दाब त्या तरुणीच्या गळ्यावर टाकला. रातराणीने स्वतःच्या गळ्याभोवती गुंडाळलेला मोठा रुमाल त्या तरुणीच्या तोंडात ठेवला. हळूहळू पाय आणि हात याचा उपयोग करून तिने गादीवरची चादर फारसा आवाज होणार नाही याची काळजी घेत फाडली आणि फाडलेल्या तुकड्याची पट्टी त्या तरुणीच्या तोंडावर बांधली.

रातराणीने तिला अलगद उचलले आणि खिडकीतून बाहेर सोडले. स्वतः खिडकीबाहेर येऊन तिने त्या तरुणीला पुन्हा उचलले आणि बेधडक चालायला सुरवात केली. तिथूनच ती बाहेर आली. त्या तरुणीला खाली ठेवून तिने तिच्या पायांच्या दोऱ्या कापल्या.

मी तुझी सुटका केलेली आहे... जोपर्यंत तू सुरक्षित आहेस असं मला वाटत नाही तोपर्यंत तुझे हात आणि तोंड मला सोडता येणार नाही. हलक्या आवाजात रातराणीने तिला समजावणीच्या सुरात सांगितले.